शा. मु. का.—आाड. (ज) क्यूबी ३७५–७,५००–२·७१

# नमुना क्रमांक २०

## लेखापरीक्षा अहवाल ( सहकारी जंगल कामगार संस्था )

## विभाग दुसरा

**१. भाग आणि ठेवी:–**

अ) दिलेल्या मजुरीमधून भागाची वर्गणी नियमितपणे कापून घेण्यात येते काय ? असल्यास, वर्षात अशी कापून घेतलेली रक्कम किती आहे ? संस्थेचे भाग भांडवल वाढविण्याचे दृष्टीने काय प्रयत्न केले जात आहेत ?

ब) ठेव खात्यातील सर्व नोंदी रोजकिर्दीतील नोंदीशी जुळतात काय ? खतावणीच्या बाक्या जमतात काय ? ठेवीच्या रकमा दिल्याबद्दल योग्य पोच पावत्या घेण्यात येतात काय ?

क) ठेवीच्या सर्व खात्यावरील अगर ५० खात्यावरील यात कमी असेल तितक्यावरील व्याज आकारणी तपासा.

ड) ठेवीवरील व्याजाचा दर काय आहे ? बिगर सभासदा–कडून ठेवी घेतल्या आहेत काय ? असल्यास, अशा ठेवींची एकूण रक्कम किती आहे ?

**२. बाहेरील कर्जः–**

अ) मध्यवर्ती बँकेकडून उभारण्यात आलेल्या कर्जाची व तारण कर्जाची (अॅडव्हान्सेस) खालीलप्रमाणे माहिती द्याः–

| पतीचा प्रकार | मंजूर रक्कम | उचललेली कमाल रक्कम | परत केलेली रक्कम | येणे बाकी | पैकी थकबाकी | कोणत्या दिनांका–पासून थकली ते |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

ब) बँकेने संजूर केलेल्या कर्जाच्या व तारण कर्जाच्या अटींची व शर्तींची संस्थेने पूर्तता केली आहे काय ? नसल्यास सर्व साधारण अभिप्रायात या मुद्यासंबंधी चर्चा करा.

क) अन्य संस्थाकडून कांही कर्जे वा रकमा घेतल्या आहेत काय ? असल्यास अशा कर्जाऊ घेतलेल्या रकमा किती आहेत व त्यावरील दिलेल्या व्याजाचा दर काय आहे ते लिहा.

ड) वन विभागाला आणि/अथवा शासनाला काही रकमा देणे आहेत काय ? असल्यास, तपशील द्या.

३. अर्थसहाय:–

१) शासनाकडून व इतर मार्गांनी मिळालेल्या अर्थसहायाचे निरनिराळे प्रकार नमूद करा.

२) असे सहाय मिळण्याबाबत घालून दिलेल्या शर्तींचे पालन करण्यात येते काय ?

४. गुंतवणुकी:–

कायदा कानू व पोटनियम यातील तरतूदीनुसार संस्थेने आपले निधी संस्थेच्या व्यवहाराबाहेर गुंतविले आहेत काय ?

५. संयुक्त संस्थेस सामिलीकरण:–

अ) मध्यवर्ती बँकेस व जंगल कामगार संस्थांच्या जिल्हा संयुक्त मंडळास संस्था सामील झालेली आहे काय ? असल्यास, तपशील द्या

ब) संस्थेच्या पर्यवेक्षणासाठी संयुक्त संस्थेने आकारलेल्या वर्गणीचा दर काय आहे ? संस्थेने वर्गणीची रक्कम संयुक्त संस्थेस वेळेवर दिली आहे काय ? तपशील द्या. दिली नसल्यास कारणे द्या.

क) संयुक्त संस्थेने ठरवून दिलेल्या नमुन्यानुसार संस्थेने जमाखर्चाची पुस्तके आणि नोंदवह्या ठेवल्या आहेत काय ? ती अद्ययावत लिहिली आहेत काय ? नसल्यास कारणे द्या.

ड) संयुक्त संस्थेने केलेल्या सूचनांचे पालन केले जात आहे काय?

६. व्यवस्थापन समिती:–

व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नावे व त्यांच्याकडील येणे रकमा द्या.

| अनुक्रमांक<br>१ | सदस्याचे नांव<br>२ | येणे बाकी<br>३ | पैकी थकबाकी<br>४ | कोणत्या दिनांकापासून थकली ते<br>५ | शेरा<br>६ |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७. कूपांचे व्यवहार:–

अ) १) संस्थेला देण्यात आलेल्या कूपाबद्दल पातन मालिका अनुक्रमांक (फेलिंग सिरीज नंबर ) कूप क्रमांक, कूपाचे क्षेत्र वगैरे तपशील द्या.

२) किती पातन मालिका अनुक्रमांक ( फेलिंग-सिरीज ) लॉगिंग पद्धतीवर आहे ते द्या.

ब) कूप व्यवहाराच्या विविध बाबीवर एकूण किती रक्कम व्यवहाराकरिता खर्च म्हणून मंजूर केली आहे ?

क) सम्मत केलेल्या रकमेपेक्षा जादा रक्कम संस्थेने विशिष्ट बाबीवर खर्च केली आहे काय ? असल्यास, हा जादा खर्च समर्थनीय आहे काय ? व त्याला वन विभागाने सम्मती दिली आहे काय ?

ड) जंगलातील कूपाची तोड पूर्ण झाली आहे काय ? कूपातील तोडलेला सर्व माल कूपाच्या क्षेत्राबाहेर नेला आहे काय ?

ई) कूपाची तोड वेळेवर झाली आहे काय ? मुदतवाढ मागितली होती काय ? ते द्या. असल्यास, मुदतवाढीची कारणे आणि त्याकरिता द्याव्या लागलेल्या अतिरिक्त खर्चाच्या रकमा द्या.

फ) कूपांचा ताबा दिल्याचे व घेतल्याचे दिनांक द्या.

ग) जेथे तोडणी काम अवघड आहे असा कूपातला भाग दर्शवा त्या भागात काम न करण्याबद्दल वन विभागाची परवानगी संस्थेने मिळविली आहे काय ?

ह) संस्थेने कूपांत काही माल सोडलेला आहे काय ? असल्यास, त्याची कारणे द्या.

इ) कूपातून काढलेल्या मालाची विक्री मालाच्या विक्री अंदाजाशी तौलनिक दृष्टया इष्ट आहे काय ?

ज) विक्री न झालेल्या शिल्लक मालाचा त्याच्या किंमती-सह तपशील द्या. शिल्लक मालाचे आवश्यक ते प्रमाणपत्र वन खात्याकडून मिळवा.

क) १) कूप तोडण्याच्या कामी किती सभासद आणि बिगर सभासद संस्थेने नेमले होते त्यांची संख्या द्या.

२) सभासदांना आणि बिगर सभासदांना वेगवेगळ्या कामासाठी दिलेल्या मजुरीचे दर व एकूण दिलेली मजुरीची रक्कम द्या.

३) सभासद आणि बिगर सभासद यांना प्रत्यक्षात दिलेल्या मजुरीचे दर वन विभागाने ठरवून दिलेल्या मजुरीच्या दरापेक्षा कमी आहेत काय ते द्या. असल्यास, कारणे द्या. वेतन मंडळाने ठरवून दिलेल्या मजुरीच्या दरापेक्षा जास्त दराने मजुरी दिली जाते काय ? असल्यास, जादा दिलेल्या अशा मजुरीच्या दराला वन विभागाच्या अधिकाऱ्याकडून मंजूरी मिळविली आहे काय ?

ल) कूपातून तोड केलेला माल करार पद्धतीने (कॉन्ट्रॅक्ट-पद्धतीने) करून घेण्यात आलेल्या कामाच्या नोंदवहीशी पडताळून पहा.

म) सभासद आणि बिगर सभासद मजुरांना त्यांना द्यावयाच्या मजूरी पोटी उचल ( अॅडव्हान्स ) द्यावयाची तरतूद संस्थेच्या पोटनियमात आहे काय ते लिहा.

न) लेखापरीक्षा कालावधीत सभासदांना आणि बिगर सभासदांना उचल म्हणून (अॅडव्हान्स) दिलेली एकूण रक्कम किती आहे ते द्या. सभासद आणि बिगर सभासद यांच्याकडून कर्ज रोखे करून घेतले आहेत काय ? लेखा परीक्षेच्या वेळी सभासद आणि बिगर सभासद यांच्याकडून चालू येणे व मागील थकबाकीच्या तपशीलासह उचलीच्या (अॅडव्हान्स) एकूण येणे रकमांचा तपशील द्या. अशा उचलींची (अॅडव्हान्स) यादी जोडा.

ओ) जुन्या येणे उचली न वसूल होण्याची कारणे द्या. संशयित आणि बुडीत कर्जाचा अंदाज करा. आणि अशा कर्जासाठी संस्थेने काय तरतूद केली आहे ते दर्शवा. ती सर्व संशयित आणि बुडीत कर्जाच्या दृष्टीने पुरेशी आहे काय ?

प) १) सभासद आणि बिगर सभासद मजुराकडून कबुली-पत्रे मिळविली आहेत काय ?

२) सभासद आणि बिगर सभासद यांना पास पुस्तकें दिली आहेत काय ? असल्यास, ५० पास पुस्तकांची रुजवात घ्या.

क्यू) सभासद संख्या वाढविण्याच्या दृष्टीने बिगर सभासद मजुरांना सभासद करून घेण्यासाठीं संस्थेने काय प्रयत्न केले आहेत ते दर्शवा.

र) संस्थेने लॉगिंग पद्धतीवर काम घेतले आहे काय ? असल्यास, दिलेली मजुरी, वाहतुक खर्च व अन्य खर्च यांचा योग्य जमाखर्च झाला आहे काय ते लिहा

स) शिल्लक मालाची रुजवात घ्या.

८. **विक्री व्यवहार:–**

१) विक्री केंद्राच्या जागा लिहा.

२) इमारती आणि जळावू लाकडाच्या जाहीर लिलावाची पुरेशी प्रसिध्दि वर्तमानपत्रातून केली आहे काय ते लिहा.

३) जाहीर लिलावाने करण्यात आलेल्या विक्र्यांना वन विभागाकडन यथावत मान्यता दिली गेली आहे काय हे लिहा.

४) जाहीर लिलावात व्यापाऱ्यांना विकलेल्या मालाची किंमत विक्रीच्या शर्ती व अटींनुसार वसूल केली गेली आहे काय हे लिहा.

५) विक्रीबाबतच्या शर्तीनुसार ज्या व्यापाऱ्यांनी रकमा दिल्या नाहीत अशांच्या विरुद्ध संस्थेने काय कारवाई केलेली आहे ते दर्शवा.

६) व्यापाऱ्याकडील हिशेब जुळविले अगर कायम केले आहेत काय ? वा त्यांच्याकडून विक्रीच्या येणे रकमा बाबत कबुलायत पत्रे मिळविली आहेत काय हे लिहा. व्यापाऱ्याकडील येणे रकमांचा दिनांकासह तपशील द्या.

७) व्यापाऱ्यांना मालाची विक्री उधारीने करण्याबद्दल पोट नियमात काही तरतूद आहे काय ?

८) व्यापाऱ्याकरिता व्यक्तिगत पतमर्यादा ठरविण्यात आल्या आहेत काय ? त्यांचे उल्लंघन झाले आहे काय ? पत मर्यादेच्या पलीकडे ज्यांच्याकडे येणी राहिली आहेत अशा प्रकरणांचा तपशील द्या.

९. **विक्री कर:–**

अ) विक्री करासाठी संस्थेने क्रमांक मिळविला आहे काय ते लिहा.

ब) कायद्यानुसार विक्री कराबाबतची आवश्यक ती सर्व माहिती व विवरणे संस्थेने संबंधित अधिकाऱ्याकडे सादर केली आहेत काय ते लिहा.

१०. **मागील वर्षाचे हिशेब पूर्ण करणे:–**

मागील वर्षामध्ये संस्थेला देण्यात आलेल्या कूपांचे जमाखर्च पूर्ण झाले आहेत काय ते लिहा. नसल्यास, कोणत्या वर्षाचे जमाखर्च पूर्ण झाले नाहीत त्याचा सकारण तपशील द्या.

११. **अन्य व्यवसाय:–**

) जंगलातील कूपांची तोडणी करण्याशिवाय अन्य काही व्यवसाय संस्थेने हाती घेतले आहेत काय ? असल्यास, अशा व्यवसायांचा तपशील द्या. अशा व्यवसायात एकूण किती रक्कम गुंतविली आहे व त्यात किती नफा अगर तोटा झाला आहे ते सकारण लिहा.

ब) अशा तऱ्हेचे जादा व्यवसाय हाती घेण्यासाठी पोट-नियमात तरतुदी आहेत काय ? नसल्यास, सर्वसाधारण अभिप्रायात या मुद्यावर चर्चा करा.

१२. कल्याणकारी योजना:—

अ) कादीकारींची स्थिती सुधारण्यासाठी संस्थेने कोणत्या महत्त्वाच्या कल्याणकारी योजना हाती घेतल्या आहेत त्याचा तपशील द्या आणि या कल्याणकारी योजनेवर संस्थेने किती रक्कम खर्च केली आहे ते लिहा.

ब) शासनाने मंजूर केलेल्या कल्याणकारी अनुदानाच्या रकमेतून संस्थेने केलेल्या खर्चाचा तपशील द्या. सहकारी खात्याच्या व संयुक्त संस्थेच्या मंजूरीने ज्या कारणासाठी रकमा मंजूर झाल्या आहेत त्याच कारणा-साठी त्या खर्च पडल्या आहेत काय हे तपासा.

१३. खर्च :—

१) व्यवस्थापक समितीपुढे खर्चाची पत्रके मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत काय ?

२) वार्षिक अंदाजपत्रके तयार करून त्यांना व्यवस्थापन समितीने व साधारण सभेने मंजूरी दिली आहे काय ?

३) विविध बाबींवर झालेला खर्च अंदाजपत्रकाच्या मर्यादेत आहे काय ? पुर्नविनियोजनाला (रिॲप्रोप्रिएशन) साधारण सभेची मान्यता आहे काय ?

४) संस्थेच्या व्यवहाराशी संबंध नसलेल्या खर्चाच्या प्रकरणांची सर्वसाधारण अभिप्रायात नोंद करा.

५) अ) शासकीय भाग भांडवलावर संस्थेने भाग लाभांश दिला आहे काय ? तपशील द्या.

ब) वर्षांत वाटलेल्या लाभांशाची (बोनस) रक्कम द्या. अधिलाभांशाची आकारणी बरोबर झालेली आहे काय हे निदान २० प्रकरणात पडताळून पहा.

क) पुढील तपशील द्या :

१) गेल्या वर्षी द्यावयाच्या अधिलाभांशाची रक्कम.

२) चालू वर्षी द्यावयाची अधिलाभांशाची रक्कम.

१४. वाहने:—

१) संस्थेने खरेदी केलेल्या विविध वाहनासाठी रोजवही (लॉगबुक) ठेवली आहे काय ?

२) वाहनांच्या वापरासंबंधी संस्थेने नियम तयार केले आहेत काय ?

३) खाजगी कामासाठी वाहने वापरल्यास त्या बाबतचा खर्च वसूल करण्यात येतो काय ?

४) अधिकृत अधिकाऱ्याकडून कार्यसूची (ड्युटीस्लिप) देण्याची पद्धत लागू केली आहे काय ?

५) दुरुस्ती, नूतनीकरण, पेट्रोल इत्यादी खर्चाची पत्रके व्यवस्थापन समितीच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आली आहेत काय ?

६) नवीन वस्तू उपयोगात आणल्यानंतर निरुपयोगी झालेल्या जुन्या वस्तूंची उदा. ट्यूब, टायर इत्यादींची नोंदवही ठेवण्यात आली आहे काय ?

७) प्रतिवर्षी पुरेशी झीज आकारण्यात येते काय ?

८) वाहने चालविण्याचा एकूण खर्च किती झाला आहे ?

९) वाहनांची एकूण किंमत किती आहे ?

लेखा परीक्षा अधिकाऱ्याची सही व पदनाम

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर